**सरकारतर्फे साक्षीदार क्र. १** **<u>सं.फौ.ख.क्र. ७०१/२०२३</u>**

महाराष्ट्र शासन वि. संदिप गायनेर

**नि.क्र. ११ खाली**

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

माझे नाव – रामेश्वर बापुराव पांडे,

वय – ५० वर्षे,

व्यवसाय – शेती,

राहणार – थडीपवनी, ता. नरखेड, जि. नागपूर

**<u>सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.व्ही. यु. मिरचे यांच्यामार्फत शपथेवर सुरूः–</u>**

दि. २८/०७/२०२३ रोजी पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी सुचनापत्र किंवा नोटीस दिले नव्हते. आता मला दि. २८/०७/२०२३ रोजीचे सुचनापत्र दाखविण्यात येत आहे. त्यातील मजकुराबाबत मला काहीही माहिती नाही. त्यावरती माझी सही आहे. थडीपवनी येथील बसस्टॉपवर असतांना पोलीसांच्या सांगण्यावरुन त्यावर सही केली. त्यास सहीपुरता निशाणी **निशाणी १६** देण्यात येत आहे. पोलीसांनी माझ्या समक्ष कोणताही घटनास्थळ जप्ती पंचनामा तयार केले नाही. आता मला दि. २८/०७/२०२३ रोजीचा घटनास्थळ जप्ती पंचनामा दाखविण्यात येत आहे. त्यावरती माझी सही आहे. त्यातील मजकुराबाबत मला काहीही माहिती नाही. थडीपवनी येथील बसस्टॉपवर असतांना पोलीसांच्या सांगण्यावरुन त्यावर सही केली त्यास सहीपुरता निशाणी **निशाणी १७** देण्यात येत आहे. पोलीसांनी माझ्याकडे कोणतीही चौकशी केली नाही व माझे बयान नोंदविले नाही. मी आरोपीला ओळखतो. तो माझ्या गावतील रहिवाशी आहे.

**(सदर साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करीत नसल्याने विद्यमान सहाय्यक सरकारी अभियोक्तांनी सदर साक्षीदार उलटतपासणीची परवानगी मागितली. साक्षीदारास उलटतपासणीमध्ये विचारल्या जाणारी प्रश्न विचारण्याची परवानगी *भारतीय पुरावा कायदा चे कलम १५४ / भारतीय साक्ष अधिनियम, २०२३ चे कलम १५७* प्रमाणे देण्यात येत).**

**२.** हे म्हणणे खरे नाही की, दि. २८/०७/२०२३ रोजी पोलीसांनी मला सुचनापत्र देउन मौजा थडीपवनी येथील पुनर्वसन शिवारात असलेल्या एका पानठेलयाजवळ पंचनाम्यासाठी बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, दि. २८/०७/२०२३ रोजी पोलीसांनी माझ्या समक्ष

घटनास्थळ जप्ती पंचनामा तयार केले. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष नगदी ५३०/– रुपये, एक निळ्या रंगाचे डॉट पेन व सट्टापत्ती साहित्य जप्त केले. मी दुसरा पंच नामे गणपत सोनुले याला ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, तो सुध्दा पंचनाम्यावर मी सही करतांना हजर होता. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी घटनास्थळ जप्ती पंचनामा वाचून दाखविला होता व त्यानंतर मी पंचनाम्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, दि. २८/०७/२०२३ रोजी पोलीसांनी माझे बयान घेतले होते. आता मला माझ्या नावाने तयार केलेल्या बयानातील अधोरेखांकित भाग अ वाचून दाखविण्यात येत आहे. ते माझ्या सांगण्याप्रमाणे नसुन पोलीसांनी का लिहिले हे मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला वाचविण्यासाठी आज रोजी शपथेवरती खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. यु. एन. घोरपडे यांच्यामार्फत उलटपासः–**

**उलटतपास नाकारले.**

**फेरतपास नाही.**

माझे समक्ष,

स.सा.वा.दा.ब.अ.क.केले.

(**रोहन विजयकुमार थाईल**)

न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, नरखेड

न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
नरखेड, नागपूर.

**दिनांकः १०/०२/२०२६.**

**दिनांकः १०/०२/२०२६**

**माझे सरतपासणी व उलटतपासणी चे पान नं. 01 ते 02 मला वाचून दाखविले व ते माझ्या सांगयाप्रमाणे आहे व Explanation V, Paragraph No. 16, Chapter VI of Criminal Manual प्रमाणे मला त्याचे विनामुल्य खरी नक्कल मिळालेली आहे.**

**साक्षीदाराची सही**
**(रामेश्वर बापुराव पांडे)**

**विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता**
**(श्री. व्ही. यु. मिरचे)**